| पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - 411018.<br>करआकारणी व करसंकलन विभाग | |
|---|---|
| परिपत्रकाचे स्वरुप | मृत्यू झालेल्या मालमत्ताधारकाची मालमत्ता हस्तांतरण करणे |
| परिपत्रक क्रमांक | कर/मुख्य/09/कावि/ 536 /2023, दिनांक 25 / 07 /2023 |
| विषय : | आकारणी पुस्तकात नोंद असलेल्या मयत व्यक्तीचे वारसा हक्काने हस्तांतरण कार्यपध्दतीबाबत... |
| अंमलबजावणी कालावधी | स्थायी |
| कोणाच्या माहितीसाठी / कार्यवाहीसाठी | मिळकत कर आकारणी, तसेच वसूली करणारे सर्व अधिकारी / कर्मचारी |
| संदर्भ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम |

परिपत्रक,

कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत शहरातील इमारत व जमिनीवर मालमत्ता कराची आकारणी व वसूली करणेत येते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ड प्रकरण 8 नियम 9 नुसार मालमत्तांच्या नोंदी आकारणी पुस्तकात घेणेत येतात. अशा आकारणी पुस्तकात नोंद असलेल्या मालमत्तेचे मालमत्ताधारक मयत झालेनंतर त्याचे वारस मयत व्यक्तीचे नाव कमी करून त्यांचे कुटुंबातील सदस्याची नावे हस्तांतरणासाठी अर्ज करतात.

तथापि, माझे असे निदर्शनास आले आहे की, वारसा हक्काने मालमत्ता हस्तांतरण प्रकरणी विभागीय कार्यालयात एकसूत्रीपणा नाही. काही ठिकाणी सरसकट सक्सेशन सर्टिफिकेट किंवा हेअरशिप सर्टिफिकेट नागरिकांना सादर करणेबाबत सूचीत करतात. वास्तविक अधिनियमातील अनुसूची ड प्रकरण 8 नियम 1 व 2 मध्ये मालमत्ता हस्तांतरणा संबंधी तरतूदी नमूद आहेत. त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्व विभागीय कार्यालयाकरिता सर्व समावेशक कार्यपध्दती असणे आवश्यक असलेले वारसा हक्काने हस्तांतरणाबाबत खालील कार्यपध्दतीचे अंमलबजावणी करणेत यावी.

1. मालमत्ता कर आकारणी पुस्तकात नोंद असलेल्या व्यक्तीचा मृत्यु झाला असलेस, अशा मयत व्यक्तीचे मालमत्तेचे वारसा हक्काने हस्तांतरण करणेकामी, मयत व्यक्तीचे वारसांनी अर्ज केला असल्यास, अशा मयत व्यक्तीचे सर्व वारसांची माहिती नमूद असलेले कार्यकारी दंडाधिकारी यांचे समोर केलेले प्रतिज्ञापत्राचे आधारे, मयत व्यक्तीचे नाव कमी करून संबंधित सर्व वारसांची नावे आकारणी पुस्तकात घेऊन हस्तांतरण कार्यवाही करावी.
2. मयत व्यक्तीचे मालमत्तेची वारसा हक्काने हस्तांतरण कार्यवाही करताना, मृत्यु दाखला व वरील प्रतिज्ञापत्राचे आधारे ऑनलाईन हस्तांतरण कार्यवाही करावी.
3. ज्या प्रकरणी मयत व्यक्तीने मृत्युपूर्व मृत्युपत्र, बक्षीसपत्र इत्यादी दस्त केले असल्यास, अशा नोंदणी दस्तांचे आधारे वारसा हक्काने हस्तांतर कार्यवाही करावी.
4. मयत व्यक्तीचे वारसा हक्काने हस्तांतर प्रकरणी, सक्षम प्राधिकारी यास अपवादात्मक प्रकरणी कार्यकारी दंडाधिकारी यांचे समोर केलेल्या प्रतिज्ञापत्रातील वारसाबाबत, सदर प्रतिज्ञापत्रातील वारसांची माहिती चुकीची किंवा दिशाभूल करणारी आहे., अशी शंका असलेस स्थानिक चौकशी करणे किंवा सक्सेशन सर्टिफिकेट, हेअरशीप सर्टिफिकेट इत्यादी कागदपत्रे सादर करणेस वारसांना आदेशित करुन हस्तांतर प्रकरणी पुढील कार्यवाही करणेत यावी.

(नीलेश देशमुख)
सहा. आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

प्रत: प्रशासन अधिकारी / सहा.मंडलाधिकारी / गट लिपिक सर्व करसंकलन विभागीय कार्यालय,